महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

# महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

## इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

**दुरध्वनी क्रं.** 0712-2959381 IN: U85300PN2019NPL187405 **ई मेल** - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/2698/2023-24 **दिनांक** :-09/12/2023

**-:परिपत्रक:-**

**विषय:- UPSC परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरीता प्रशिक्षण केंद्राची निवड करण्याकरीता मुदतवाढ.**

UPSC प्रशिक्षणाकरीता महाज्योतीची परीक्षा दिलेल्या सर्व उमेदवारांकरिता प्रशिक्षण संस्था निवडीचा पर्याय दि.06/12/2023 रोजी च्या परिपत्रकांमुळे उपलब्ध करून देण्यात आला होता. तथापि, पसंती क्रम नोंदविलेल्या विद्यार्थ्यांचा डेटा पहिला असता अजूनही 280 विद्यार्थ्यांनी आपला प्रशिक्षण संस्था निवडीचा पसंती क्रम नोंदविल्याचे दिसून येत नाही.

या अनुषंगाने सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास खालील बाबी आणून देण्यात येत आहे.

1) विद्यार्थ्याने प्रशिक्षण संस्था निवडीचा पसंती क्रम नोंदविणे अनिवार्य आहे. याशिवाय विद्यार्थ्याला मराठी माध्यमाला प्रवेश घ्यावयाचा की इंग्रजी माध्यमाला हे स्पष्ट होऊ शकणार नाही.
2) या प्रशिक्षणाकरीताच्या यापूर्वीच्या सर्व निवड सुची रद्द करण्यात आलेले आहेत.
3) विद्यार्थ्याने जर प्रशिक्षण संस्था निवडण्याकरीता प्राधान्यक्रम दिला नाही तर विद्यार्थ्यांची प्रशिक्षणाकरीता निवड होऊ शकणार नाही याची जाणीव विद्यार्थ्यांना पुनश्च करून देण्यात येत आहे.
4) ज्या विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण संस्था निवडीकरीता पसंती क्रम दिलेला नाही अशा विद्यार्थ्यांची यादी यासह प्रकाशित करण्यात येत आहे.
5) या विद्यार्थ्यांना त्यांचा पसंती क्रम नोंदविण्याकरीता दि.11/12/2023 रोजी 11.00 PM वाजेपर्यंत प्रशिक्षण केंद्र निवडण्याकरीता पुनश्च वेळ देण्यात येत आहे.
6) विहित वेळेमध्ये जर विद्यार्थ्यांनी पर्याय नोंदविला नाही तर संबंधित विद्यार्थी हे प्रशिक्षणाकरीता इच्छुक नाहीत असे मानून ज्या विद्यार्थ्यांनी पसंती क्रम दिलेला आहे त्यांचा विचार करून इंग्रजी माध्यमाकरीता आणि मराठी माध्यमातून निवडावयाच्या प्रशिक्षणार्थ्यांची यादी जाहीर करण्यात येईल.

UPSC परीक्षा प्रशिक्षणाच्या प्रवेशाकरीता परीक्षा दिलेल्या सर्व उमेदवारांनी या सुचनांची नोंद घ्यावी.

स्वा
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर.